Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार

**डॉ. नितीन हरीदास गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद.

**प्रितम लहानू मोरे**
पीएच.डी (संशोधक )
राज्यशास्त्र
डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकात भारताला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहायचे आणि त्याच बरोबर ४० टक्के जनता शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कौशल्य भारतातील राजकर्त्यांना चांगल्या प्रकारे अवगत आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ वर्ष पूर्ण होई पर्यत प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे अशी तरतुद केलेली होती. पण राज्यघटना अमंलात येवून अर्धे शतक उलटून ही मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे उद्दिष्ट्ये आपण साध्य करू शकलेलो नाही. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्यामध्ये प्रामुख्याने खेड्यातील झोपडपट्ट्यातील गोर-गरिब आणि मागासवर्गीय तसेच दारिद्रय रेषेखाली येणारा समाज आहे. या वंचिताचे शिक्षण योग्य रित्या होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत कलम ४६ मध्ये तरतुद करून ठेवली आहे की, देशातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती व जमातीना शिक्षण देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत व त्याचे काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करावे आणि त्याचे सामाजिक अन्याय व इतर सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करावे. इतर जाती-वर्णांनी शिक्षण घेऊ नये आणि स्वत: ब्राम्हणांनीच शिक्षण घ्यावे असे तपासून पाहिजे तर ब्राम्हण खरेच शिक्षण घेतात का? खरेच ज्ञान मिळवतात का? त्याच्या शिक्षणाचा हेतु काय? या प्रश्नाची उत्तरे शोधतांना असे दिसून येते की, 'शिक्षण हे ज्ञानप्राप्तीसाठी नसून केवळ धंदा आहे. त्याचे शिक्षण घेणे म्हणजे केवळ ज्ञानार्जन करणे नसून परिश्रमाशिवाय पोट भरण्याची वा चंगळ करण्यासाठी इतरांची फसवणूक करण्याची कला अवगत करणे होय. पूजाविधी करण्यापूरते किंवा नोकरी मिळण्यापूरते अत्यंत संकूचित असे ध्येय त्याच्या शिक्षणाचे असते. त्यावरून ते स्वत:ही शिकत नाहीत आणि इतरांना ही शिकू देत नाहीत. या बाबत उदाहरणा दाखल पूरावा देताना डॉ. आंबेडकर म्हणतात "ब्राम्हणानी शिक्षणाची किंवा ज्ञानप्राप्तीची आवड असती तर त्याच्या बायकाच्या गळ्यात मोहनमाळ असण्याऐवजी घरी पूस्तकाचा मोठा संग्रह असता. पण ब्राम्हणाच्या घरी नाही अशी जर कोणती वस्तु असेल तर ते पूस्तक होय"

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार :-**

शिक्षणाचे महत्व स्पष्ट करतांना महात्मा फुलेनी अविद्येने कसे अनर्थ घडतात ते स्पष्ट केले. त्याच प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. "उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास मानूस हितबल होऊन अल्पायूषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम बनतो" या गोष्टीचे महत्व प्रतिपादीत करण्यासाठी त्यांनी आई-वडीलाना मुलांच्या शरिराच्या व बुध्दीची शक्य तितकी चांगल्या प्रकारे जोपासना करावी असा उपदेश केला.

दि. २०/०७/१९२४ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारणी सभा' या संस्थेची मुंबईच्या परळ येथे 'स्थापन केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संस्थेचे अध्यक्ष होते. त्याच वेळी त्यांनी बहूजन समाजाला "शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा" असा महत्वपूर्ण संदेश दिला या संस्थेच्या वतीने शिक्षणाची प्रगती अशी होईल यांचा अभ्यास करण्यासाठी एक कमिटी नेमण्यात यावी अशी मागणी केली. कुलाबा जिल्हाच्या बहिष्कृत वर्गाचे पहिले अधिवेशत भरविण्यात आले. त्यात त्यांनी काही ठराव संमत

केले. त्यानुसार किमान ३४० मुले असलेल्या गावात शाळा सुरू करावी, मागसवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती द्यावी, प्रत्येक जिल्हात विद्यार्थीसाठी वसतीगृह निर्माण करावे अश्या सुचना मान्य करण्यात आल्या.

शिक्षणाशिवाय व्यक्ती, समाज देशाची प्रगती होण शक्य नाही, परंतु या देशात केवळ 'एकाच वर्गाने शिकावे' असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा देशाची प्रगती होणे शक्य नाही असे निश्चितपणे समजावे भारतीय समाजव्यवस्थेनुसार व धर्मव्यवस्थेनुसार केवळ ब्राम्हणाणीच शिकावे अशी तरतुद असल्याने या देशाची प्रगती होऊ शकली नाही. त्यासाठी सरकारने आपल्या देशातील प्रजेला सुशिक्षित करण्याची जवबादारी सर्वस्वी स्वत:वर घ्यावी असे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मागासर्गीय जाती-जमातीच्या तसेच बहूजनाच्या शिक्षणाची ज्या प्रमाणे काळजी होती, तितकाच गांभिर्यान ते अल्पसंख्याकाच्या शिक्षणाबद्दल विचार करत त्यासाठी राज्यघटने च्या २९ व ३० कलमांची तरतुद केली. त्यानुसार "राज्याच्या खर्चाने चालणाऱ्या किंवा राज्याच्या पैशाच्या साहय्याने चालणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात भाषा किंवा लिंग या पैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही" कलम [29(1)] धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संख्या स्थापण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल कलम [30(1)]
"शैक्षणिक संस्थांना सहाय्य देताना राज्याद्वारे एखादी संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक समाजाच्या व्यवस्थापनाखाली असल्याच्या कारणावरून भेदभाव करणार नाही" कलम [30(2)]

"खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागते, तो न्युनगंड त्याच्यापासून नाहिसा करणे, चालू समाजपध्दतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले तसेच त्यांचे त्याच्या स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्व आहे. याची जाणिव करून देणे हीच खालच्या वर्गाचा खरा प्रश्न असून उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे." अशी शिक्षणविषयाची डॉ. बाबसाहेब आंबेडकरांची भुमिका होती. ते शिक्षणाविषयी अतिशय गांभिर्याने विचार मांडतात. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन मानले होते. म्हणून त्यांची अशी धारणा होती की, समाजामध्ये जे बदल अपेक्षित आहे जी समता हवी आहे, जे स्थित्यंतर व्हायवयास पाहिजे ते केवळ शिक्षणाच्या माध्यमातुन होणे शक्य आहे. शिक्षण ही स्वांतत्र्याची प्रेरक शक्ती आहे असे त्यांना वाटत होते. डॉ. आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधूता आणि सामाजिक न्यायासाठी आपल्या हयातभर प्रयत्न केल्याचे आपल्याला दिसून येते. यासाठी ते सामाजिक विचारही प्रकर्षाने मांडतात. शिक्षण ही अत्यंत मुलभूत गरज असून मानवी विकासास पोषक अशी बाब आहे, असे त्यांना वाटत होते.

भारतात प्रत्येक जातीचा एक विशिष्ट धंदा होता आणि तो ब्रिटिश सरकारपर्यंत तसाच चालु होता. बहूजन समाजाचे व अस्पृश्य वर्गाचे शिक्षण पूर्णपणे दुर्लक्षित होते याची खंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकारला प्राथमिक शिक्षण सक्तीने, मोफत आणि सार्वत्रिक करण्याचे व त्याची जबाबदारी सरकारने खर्चाला न भिता स्वत: घ्यावी अशी मागणी केली होती.

समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणाकडे बघतात ते म्हणतात "शिक्षणाने व्यक्तीमत्व बदलते आणि व्यक्ती बदलली की समाज बदलेल" अस्पृश्यांची शिक्षणाशिवाय क्रांती होणार नाही आणि क्रांती शिवाय या देशात शांती नांदणार नाही हे शिक्षणसुत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मांडले आहे. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व मागासलेपणाचे प्रमुख कारण आर्थिक परिस्थिती आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ओळखले होते, त्या अनुषंगाने त्यावर प्रभावी उपाय म्हणून एकंदरीत शिक्षण प्रक्रियेत त्याच्यासाठी वसतिगृह काढणे याला त्यांनी अग्रक्रम दिलेले दिसून येतो.

आज ही खेड्यातील गरिब होतकरू विद्यार्थी शहरात राहण्याची व जेवणाची सोय करणे विद्यार्थ्यांना शक्य नसते, त्यावर शासनाने प्रभावी उपाय म्हणून अस्पृश्यासाठी वसतीगृहांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

शिक्षणाकडे पाहण्याच्या त्याच्या दृष्टिकोन रचनात्मक व विधायक असल्याचे दिसते. समाजातील जनतेच्या मुलभूत गरजा पूर्ण करणे हे शासनाचे कर्तव्य ठरते संपूर्ण समाजाचे पूर्णगठन त्यांना अपेक्षित होते. त्यासाठी अस्पृश्य समाजाला राजकारणात सहभाग मिळावा हा त्यांचा प्रयत्न होता समाजातील प्रत्येक स्तरावला आधुनिक ज्ञान संपादन करण्याची संधी मिळाली पाहिजे त्यांना नागरिक म्हणून पार पाडवयाच्या जबाबदाऱ्याची जाणिव होईल. मागासवर्गियांना प्रतिनिधित्व दिल्यामुळे ते आधुनिक ज्ञानाला सामोरे जातील ते मत नोंदवतील. विद्यापिठाने उच्च शिक्षणाच्या सोई गरीब गरजू जनतेला उपलब्ध करून दिल्या पाहिजे मागासवर्गीय व दलित जाती जमातींना विद्यापिठांनी शैक्षणिक धोरण ठरविण्याचा व ते राबविण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे अत्यावश्यक आहे, असे बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते.

**स्त्रीशिक्षण विषयक विचार :**

डॉ. आंबेडकरांनी अनेक सभा संमेलनातून महिला परिषादातून, लिखाणातून, हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून व राज्यघटनेतून स्त्री-पूरूष समानता यावर भर दिली आहे. स्त्रीशिक्षणाचा पूरस्कार केला आहे. त्या काळातील समाज स्त्री शिक्षणाबदल उदासिन होता. समाज अशिक्षित असल्यामुळे व रुढी, पंरपरेमुळे एका घरात साधारणत सात आठ मुले असत. मुलींच्या शिक्षणामुळे दुर्लक्ष करण्यात येत असे परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "ज्या घरातील स्त्री सुशिक्षित आहे ते घर सुशिक्षित होते. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देत असतांना मुलीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नका"

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड समता संग्रामाच्या वेळी दि १७/१२/१९२७ रोजी स्त्रीयाना उद्देशून जे भाषण केले त्यात त्यांनी शिक्षणाचे महत्व विषद केले, "तुम्ही आपल्या मुलींना ही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या गोष्टी काही पुरूषासाठीच नाहीत त्या स्त्रीयांनाही आवश्यक आहे. "मुलीचे अत्यंत महत्वपूर्ण आहे. कोणत्याही समाजातील स्त्रीयांचा दर्जा हा तो समाजाच्या सुधारणेचा मापदंड असतो असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

अज्ञानाच्या काळोखात अस्पृश्य भरकटला गेला होता. त्यातून त्यांना योग्य दिशा दाखवण्याचे काम केवळ शिक्षणच करू शकते यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विश्वास होता. या समाजाची प्रगती करायची असेल तर स्त्री-शिक्षण देणे, महिलांना जागृत करणे गरजेचे आहे. त्यासाठी डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी सभा घेण्यात सुरूवात केली या संदर्भात ते स्त्रीयांना उद्देशून म्हणतात "तुमच्या पोटी जन्मलेल्या पाल्याचा अपमान होऊ नये, त्यांना सन्मानाचे जगणे द्यायचे असेल तर तुम्ही मागास राहून चालणार नाही, काही शिकायला पाहिजे, अस्पृश्यांचे लाजिरवाणे जगणे झुगारून तुमचे शिकणे आणि संघटित होणे आवश्यक आहे.

महाड येथील सभेत भाषण करतांना त्यांनी आपली पूढील पिढी सुधारावयाची असेल तर तुम्ही त्यांना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका. असा सल्ला त्यांनी दलित स्त्रीयांना दिला आखिल भारतीय दलित महिला परिषदेसमोर (१९२४) भाषण देताना आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले "तुम्ही सर्व प्रथम शिक्षित व्हा, आपल्या मुलामुलींना शिकवा त्यामुळे देशाचा विकास होईल तुमच्या अस्मितेची ही माणूस म्हणून तुम्हाला ओळख होईल कारण शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे. जो प्राशान करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही."

स्त्री विकासाच्या दृष्टीने डॉ. आंबेडकरांनी तळमळीने प्रयत्न केले. त्यांना स्त्रीयांची सुधारणा करायची होती ते म्हणतात "स्त्री शिक्षणाची समजोन्नती करीता आवश्यकता आहे. स्त्रीयांनी पुरूषाबरोबर सार्वजनिक आयुष्यात उतरले पाहिजे केवळ पूरूष वर्ग पूढे जावून स्त्रीया मागे राहिल्या तर कुठल्याही समाजाची प्रगती होणार नाही" यातून आपणास स्त्री-पूरूष समानतेचा प्रखर पूरोगामी विचार डॉ.

बाबासाहेब आंबेडकराच्या विचारातून दिसून येतात. स्त्री ही स्वतंत्र व्यक्तीमत्व आहे. तिचे व्यक्तीमत्व विकसित करण्याची संधी तिला मिळाली पाहिजे.

**निष्कर्ष:**

एकंदरीत भारतीय राज्यघटने नुसार १९६० पर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हायला हवे होते. परंतू शासनाने सार्वत्रिक शिक्षणाच्या ध्येयपूतीसाठीची मुदत १९७५, १९८०, १९८५, १९९०, १९९५,२०००, आणि शेवटी २०१०,२०२० पर्यत वाढवित नेली. हे जे स्वतंत्र्य भारताचे ७०-८० वर्षानंतरचे परिणाम आज जाणवत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४ मध्ये म्हणजेच ९८ वर्षापूर्वीच सांगितले व धोरणात्मक उपाय सुचविले होते. त्यातुनच त्याची शिक्षणाविषयीची दुरदृष्टी स्पष्ट होते. याबाबत त्यांनी सांगितलेल्या काही बाबी आजही लक्षात घेणे आवश्यक आहेत.

- सार्वत्रित शिक्षणाचा सर्वांगीन प्रसार हा राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया होय म्हणून याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे.
- सक्तीचा कायदा करून त्यांची प्राथमिक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.
- शिक्षणात एकसुत्रीपणा व शिस्तबद्ध व्यवस्थापन आवश्यक आहे.
- शिक्षणातील असंबध्द लोकांची लुडबूड बंद करावयास हवी
- शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वत:कडे घ्यावी स्थानिक संस्थाकडे सोपवू नये.
- शिक्षणावर प्रांतिक सरकारचेच नियंत्रण असावे
- सर्व प्रांताची शैक्षणिक प्रगती सारख्याच प्रमाणात झाली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय किर
२. पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर-गंगाधार पाणतावणे
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा – डॉ. सुधाकर नवसागर
४. दलिताचे शिक्षण-शंकरराव खरात
५. विद्यार्थ्यांनो जागृत व्हा-भारत वाघमारे
६. सामाजिक क्रांतीची दिशा - वामन निंबाळकर